**श्री. रामदास चव्हाण, अपील प्राधिकारी तथा**
मुख्य समाज विकास अधिकारी
खात्याचे नांव व पत्ता :–समाज विकास विभाग,
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर,पुणे–५
दूरध्वनी क्रमांक :–२५५०१२८१
कार्यालयीन वेळ :– स.९.४५ ते सायंकाळी ६.१५
खात्याचा ई–मेल :– sdd@punecorporation.org

पुणे
Pune
अद्वितीय
& Unique

माहितीचा
अधिकार

जावक क्रमांक :– सविवि/ २८५९
दिनांक :– १२/१२/२०२५

अपील प्राधिकारी तथा मुख्य समाज विकास अधिकारी यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका.

अपील क्रमांक :- पुणे मनपा/अ.प्रा.तथा अपील प्राधिकारी/अपील क्र. १७ /२०२५

अपिलार्थी नांव व पत्ता :-
सौ.शोभा भुजंग कांबळे
स.नं. १२, लक्ष्मीनगर येरवडा, पुणे -४११००६

जन माहिती अधिकाऱ्याचे नांव व हुद्दा :-
श्री. असंग पाटील,
उप समाज विकास अधिकारी,
समाज विकास विभाग,
पुणे महानगरपालिका.

सौ.शोभा भुजंग कांबळे --- अपिलार्थी

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी,पुणे महानगरपालिका
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपील

अपिलकर्ता यांनी दिनांक ०३ /१०/२०२५रोजी जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी, पुणे महानगरपालिका यांचेकडे अर्ज करुन मागणी केलेली माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती व इतर पत्रव्यवहारासंबधीची माहिती :-

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करुन द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| ०३/१०/२०२५ | ०२/११/२०२५ | २९/१०/२०२५ | - | - |

प्रथम अपील अर्ज दाखल करण्याचे कारण :- अर्जदाराचे दिनांक ३/१०/२०२५ रोजीच्या अर्जाप्रमाणे त्यांना अपूर्ण माहिती दिल्याने प्रथम अपील अर्ज दाखल करण्यात आला आहे.

| प्रथम अपील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपील दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपील अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपील सुनावणी सूचना पाठविल्याचा दिनांक |
| २८/११/२०२५ | १८/११/२०२५ | होय | लागू नाही | १८/११/२०२५ |

<u>प्रथम अपील सुनावणी दिनांक व वेळ :-</u> दिनांक ९/१२/२०२५, स. ११.००वाजता.

<u>सुनावणीस अपिलकर्ता उपस्थित/अनुपस्थित :-</u> दिनांक ९/१२/२०२५ रोजीच्या सुनावणीस अपिलकर्ता हे स्वत: उपस्थित होते.

<u>सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित/अनुपस्थित :-</u> दिनांक ९/१२/२०२५ रोजीच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जन माहिती अधिकायाने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | १. प्रेरणा महिला बचत गट , २. सिध्दार्थ महिला बचत गट ,३. ओंकार महिला बचत गट या बचत गटाच्या स्थापने पासून आजतागायत सर्व पदाधिकारी व सदस्यांची नावे | सदर विषयाचा माहिती तक्ता सोबत जोडणेत येत आहे. |

"विवेचन"

अपिलार्थी यांनी प्रेरणा महिला बचत गट व ओंकार महिला बचत गटाचे सन २००३ पासून ते आज तागायत सदस्य व मुख्य सदस्यांची नावे, हिशोब व त्यांची बचत किती जामा आहे याबाबत माहिती देणेबाबत अपिलकर्त्यांने सुनावणी दरम्यान त्यांचे म्हणणे मांडले.

"आदेश"

सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांचे विवेचनानुसार माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्रेरणा महिला बचत गट व ओंकार महिला बचत गटाच्या स्थापने पासून ते आजतागायत किती सभासद होते याबाबत उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना देणेत आली असल्याने सदरच्या माहितीने अपिलार्थी यांचे समाधान झाले असून सदरचे अपिल निरस्त करणेत येत आहे.

(रामदास चव्हाण)
अपील प्राधिकारी तथा
मुख्य समाजविकास अधिकारी
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

दिनांक :-
ठिकाण :- पुणे.

टीप :-

१) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,पुणे खंडपीठ,पुणे,नवीन प्रशासकीय इमारत,४ था मजला,पुणे-१ यांचेकडे द्वितीय अपील करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.
२) या आदेशाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत :-

१) जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका
२) सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका
३) सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका
४) [illegible] शिवाजीनगर पुणे

यांजकडे पुढील जरूर त्या कार्यवाहीसाठी व माहितीसाठी

D:\SDD new\MAHITI ADHIKAR\Mahiti Adhikar 2025\APIL 2024-25\17-2025 Apil Shobha Kamble Nov.doc